रजि. नं.: केपीआर/केव्हीआर / आरएसआर / (सीआर) ४३० सन २०१४-१५
स्थापना: २२/०५/२०१४

छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर

सामाजिक व विविध उपक्रमात सहभाग

१३ वा वार्षिक अहवाल

ऊर्जा वाचवा,
पृथ्वी वाचवा...

ऑडिट वर्ग 'अ'

डिव्हीडंड 15%

१००% कर्जमाफी

1507, सी वॉर्ड, गाळा नं. 205, दुसरा मजला, भूपाल टॉवर, सुभाष रोड,
फोर्ड कॉर्नर, लक्ष्मीपूरी, कोल्हापूर 416 002

आमचे प्रेरणास्त्रोत व आधारवड

तव स्मरण संतत !
स्फुर्तिदायी आम्हा

स्वर्गीय

आमदार श्री. पी. एन. पाटील

साहेब (सडोलीकर)

छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. कोल्हापूर.

संस्थापक चेअरमन

शिक्षक नेते,
कुशल मार्गदर्शक व नुतन
चेअरमन

दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि. कोल्हापूर

श्री. एस. व्ही. पाटील (सर)

चेअरमन, दि प्राथमिक शिक्षक बँक लि. कोल्हापूर.
राज्यसंपर्क प्रमुख, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ
माजी निमंत्रित सदस्य, शिक्षण समिती जि. प. कोल्हापूर
माजी जिल्हाध्यक्ष, प्राथमिक शिक्षक संघ, कोल्हापूर.

दि प्राथमिक शिक्षक बँक लि. कोल्हापूर च्या चेअरमनपदी निवड झालेबद्दल...

हार्दिक अभिनंदन...

संचालक मंडळ

संस्थापक चेअरमन

श्री. साताप्पा विष्णू पाटील
(एस. व्ही.)

व्हाईस चेअरमन

सौ. पद्मावती प्रकाश काळुगडे

संचालक

श्री. बाबुराव
रामचंद्र खोत

श्री. बाळासाहेब
राजाराम माने

श्री. राजाराम
तुकाराम घुंगुरकर

श्री. प्रकाश
पांडुरंग गायकवाड

श्री. संभाजी
विठ्ठल एकशिंगे

श्री. रामचंद्र
महादेव माने

श्री. अनिल
रामचंद्र वरुटे

श्री. माया
प्रमोद भिसे

श्री. बाबुराव
शिवाजी पाटील
तज्ञ संचालक

श्री. जयवंत
ईश्वरा तौंदकर
मॅनेजर

श्री. हरी
नारायण शिपेकर
क्लार्क

छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस
(फक्त सभासदांकरिता)

आपल्या **छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. कोल्हापूर** या संस्थेची **१३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १२/०९/२०२६ इ. रोजी दुपारी १२.३० वा. रोटरी समाज सेवा केंद्र, श्री माधवप्रसाद गोएंका भवन, नागाळा पार्क, कलेक्टर ऑफिस रोड, कोल्हापूर.** येथे बोलविणेत आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस सहभागी व्हावे, ही विनंती.

- सभेपुढील विषय -

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२) सन २०२५–२६ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा–तोटा पत्रके वाचून मंजूर करणे.

३) सन २०२५–२६ या सालात झालेल्या खर्चास व बजेटपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे. तसेच सन २०२६–२७ सालाकरिता उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

४) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५–२६ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे.

५) सन २०२५–२०२६ अखेरच्या शासकीय लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे.

६) सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखा परीक्षकांची नेमणूक करणे आणि त्यांचे मानधन ठरवणे.

७) संस्थेसाठी स्वमालकीची इमारत घेणे बाबत.

८) मासिक वर्गणी न येणाऱ्या व क्रियाशिल नसलेल्या सभासदांचे सभासदत्व रद्द करणेबाबत.

९) मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेवरून

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : ०२/०९/२०२६

श्री. जयवंत ईश्वरा तौंदकर	सौ. पद्मावती प्रकाश काळुगडे	श्री. साताप्पा विष्णू पाटील(एस.व्ही.)
मॅनेजर	व्हा. चेअरमन	चेअरमन

व सर्व संचालक मंडळ

टीप :-

१) ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे असतील त्यांनी लेखी प्रश्न दि. ०८/०९/२०२६ पर्यंत सायं. ७ वा. पर्यंत पतसंस्था कार्यालयाकडे पाठवावेत.

२) सर्व सभासदांनी सभेसाठी सहभागी व्हावे.

सभास्थळी सर्वांच्या उत्तम शाकाहारी भोजनाची व्यवस्था केली आहे.

श्रद्धांजली

अहवाल सालात दिवंगत झालेले संस्थेचे सभासद, त्यांचे नातेवाईक, ठेवीदार, हितचिंतक तसेच जागतिक व भारतीय कीर्तिचे थोर विचारवंत, सहकारधुरीण, शिक्षणतज्ञ, समाजसेवक, सैनिक व आपल्या भागातील नागरिक, तसेच अन्य विविध दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले निष्पाप लोक यांना संस्थेच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली ! त्यांच्या आत्म्यास चिरशांती मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना. आजची ही सभा सर्वांना नम्रतापूर्वक अभिवादन करून त्याच्या प्रती भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

बँकर्स

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,
शाखा – बिंदू चौक, कोल्हापूर.
खाते नंबर – ०३०४१०००११००००४
IFSC Code : IBKL 0463 KDC

दि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक,
मुख्य शाखा – करवीर.
खाते नंबर – ०००२११०५२०००२७२
IFSC Code : IBKL 0464 PSS

* पत्ता *
१५०७, सी वॉर्ड, गाळा नं. १२६, दुसरा मजला, भूपाल टॉवर, सुभाष रोड, फोर्ड कॉर्नर, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर ४१६००२
मोबा: ९४२०४५९२९२/९८६०८०८९१९

॥ जय सहकार ॥



सन २०२५-२०२६ सालचा

१३ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सन्माननीय सभासद बंधू–भगिनींनो, सन २०२५–२०२६ सालच्या १३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने छ. शिवाजी शिक्षक पतसंस्थेच्या परिवारातील सदस्य म्हणून आपण सहभाग नोंदवलात, त्याबद्दल संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो.

मित्रहो, सहकार हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. म्हणूनच आपण 'विना सहकार नही उद्धार' या म्हणीचा सातत्याने वापर करतो. यासाठी सहकार कायदा हा केवळ संस्थांना आर्थिक शिस्त लावण्यासाठी निर्माण झाला आहे. म्हणून आपण चालवत असलेल्या छ. शिवाजी शिक्षक पतसंस्थेचे पावित्र्य अबाधित राखून त्या माध्यमातून सभासदांचे हित जोपासत त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा किंबहुना सर्वांगीण विकास करावा यासाठीच संस्था कार्यरत राहून काम करत आहे.

सहकार खात्याच्या निकषानुसार संस्थेने केलेल्या आदर्शवत व पारदर्शक कारभाराची पडताळणी होऊन **संस्थेला रुपये ४५ लाख सर्वसाधारण कर्ज, रुपये ५ लाख आकस्मिक कर्ज, रुपये १ लाख अल्पमुदत कर्ज असे रुपये ५१ लाख** कर्जास मान्यता मिळाल्याने सभासदांची गरज व मागणी लक्षात घेऊन त्याप्रमाणे कर्जवाटपही सुरू केले आहे. **सभासदांना वरीलप्रमाणे कर्जपुरवठा करताना संस्थेने कोणत्याही वित्तीय संस्थेचे कर्ज न घेता जमा ठेवीतूनच ही कर्जे दिली आहेत. ही बाब संस्थेस भूषणावह आहे.**

आपल्या संस्थेला प्रत्यक्षात काम करण्यास **१२वर्षे एवढा कमी कालावधी** मिळूनही मिळालेल्या कालावधीत अनेक

नेहमी तत्पर रहा, बेसावध आयुष्य जगू नका

अडचणींचा सामना करत, सर्वांचा विश्वास संपादन करत पहिल्या वर्षापासून **सभासदांना १०% डिव्हिडंड व चालू वर्षी १५% डिव्हिडंड** तसेच प्रत्येक सभासदाला **दिवाळी भेट, कायम ठेव व मासिक वर्गणीवर ज्यादातर व्याज** देऊन त्यांचा संस्थेवरील विश्वास द्विगुणित करण्याचे काम सातत्याने केले आहे.

यापुढेही आपली संस्था सभासदांच्या हिताचाच पारदर्शक कारभार करत राहील याची मी तुम्हांला ग्वाही देतो व आपणासमोर दि. ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या सहकार वर्षातील कामकाजाचा अहवाल, तेरीज, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व अंदाज पत्रक सादर करत आहे.

मित्रहो, तत्कालिन परिस्थितीत संस्थेच्या उभारणीसाठी आपण सर्वांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता खूप सहकार्य तर केलचं, पण भक्कम पाठबळही दिलत, त्यामुळेच तुम्हाला विनंती करतो, आपण संस्था प्रगतीसाठी व सभासदांच्या हितासाठी या मिटींगमध्ये विधायक सूचना कराव्यात.

सभासद संख्या :-	
दि. ३१ मार्च २०२५ अखेर सभासद संख्या	३४५
दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३१/०३/२०२६ अखेर कमी झालेले सभासद	१५
दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३१/०३/२०२६ अखेर सभासदत्वासाठी मागणी केलेले अर्ज	१३
दि. ३१/०३/२०२६ अखेर सभासद संख्या	३३०

सभासद भागभांडवल :- (रु. ५,९७,५३०/-)

दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेचे भागभांडवल रु. ६,००,७३०/- इतके होते. अहवाल सालात काही सभासद कमी झालेने वर्षाअखेर संस्थेचे भागभांडवल रु. ५,९७,५३०/- इतके झाले आहे.

आयुष्यात खरे प्रेम, खरी माया फार दुर्मीळ असते.

ठेवी :- (रु. १०,१२,४४,६७५.७७)

संस्थेकडे अहवाल सालात विविध प्रकारच्या ठेवींच्या माध्यमातून ३१ मार्च २०२६ अखेर रु. १०,१२,४४,६७५.७७ इतक्या ठेवी जमा आहेत. तद्नंतर दि. ३१/०७/२०२६ अखेर त्यामध्ये आणखी भरीव वाढ होऊन या ठेवींनी १२ कोटी ३२ लाख ५१ हजार ९८१ चा पल्ला गाठला आहे.

ठेवींबद्दलची सुरक्षितता, विश्वासार्हता व आकर्षक व्याजदर यामुळे ठेवींचा ओघ सातत्याने वाढत आहे.

ठेवी उपलब्ध करून देण्यासाठी सहभागी झालेले सर्व ठेवीदार, सभासद, बिगर सभासद, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, सहकारी संस्था आणि सर्व हितचिंतक यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे आभार मानतो.

कर्जे :- (रु. १०,१३,०९,२६०/-)

सभासदांनी आपल्या अडचणीसाठी कर्जे काढत असताना **अन्य वित्तीय संस्थेचा पर्याय न अवलंबता आपली संस्था** मोठी झाली पाहिजे, या उदात्त भावनेने आपल्याकडीलच रु. १०,१३,०९,२६०/- इतक्या रक्कमेची कर्जाची उचल केली आहे. तद्नंतर दि. ३१/०७/२०२६ अखेर सभासदांनी केलेल्या कर्ज उचलीमुळे एकूण कर्जपुरवठा रु. ११ कोटी २३ लाख ७७ हजार ३१८ पर्यंत पोहोचला आहे.

ठेवीदार जेवढा महत्त्वाचा **तितकाच कर्जदार** देखील महत्त्वाचा आहे. कारण त्यांच्याकडून मिळालेल्या व्याजावरच आपण पुढची समीकरणे मांडत असतो. म्हणूनच कर्जदार सभासदांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे आभार मानतो. तसेच सभासदांना विनंती करतो की, आपणही आपल्याच संस्थेकडे कर्जाची उचल करून संस्थेवरील विश्वास द्विगुणित करावा, ही विनंती.

उलाढाल :- (रु. १९,६९,२५,४०७.६०)

सन २०२५-२६ मध्ये रु. १९,६९,२५,४०७.६०/- (एकोणीस कोटी एकोणसत्तर लाख पंचवीस हजार चारशे सात साठ पैसे) इतकी झाली आहे.

हक्क आणि कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

नफा विभागणी :- (रु. १०,३६,८७२.२०)

दि. ३१/०३/२०२५ मध्ये संस्थेस निव्वळ नफा रु. १०,००,७९२.८०/-इतका झाला होता. अहवाल सालामध्ये सर्व तरतुदी वजा जाता रु.१०,३६,८७२.२०/-इतका नफा झाला आहे. नफ्यामध्ये दरवर्षी होणारी भरीव वाढ ही संस्था कामकाजास भुषणावह आहे. या निव्वळ नफ्याची विभागणी पुढीप्रमाणे व्हावी अशी व्यवस्थापक समितिची शिफारस आहे.

रिझर्व्ह फंड (राखीव निधी) २५%	रु.	२,५९,२१८.००
डिव्हीडंड (लाभांश) १५ %	रु.	९०,११०.००
धर्मादाय निधी	रु.	५,०००.००
इमारत निधी (फंड)	रु.	४,७५,०००.००
बुडित फंड	रु.	२५,०००.००
सभासद कल्याण निधी	रु.	१,८२,५४४.२०
एकूण...	**रु.**	**१०,३६,८७२.२०**

संचालक मंडळ सभा :- (१४)

अहवाल सालात व्यवस्थापक समितीच्या एकूण १४ सभा झाल्या. या सभांमधील सर्व ठराव सर्वानुमते मंजूर झालेले आहेत.

✻ संस्था कामकाजास मार्गदर्शन व मदत करणारे ✻
• पार्लमेंटरी बोर्ड सदस्य •

श्री. एकनाथ बा. पाटील, श्री. शिवाजी नि. खाडे, श्री. काशिनाथ य. कुंभार, श्री. मारुती सो. माने, श्री. बजरंग रा. कुलगुडे, श्री. अर्जुन र. कराड, श्री. माणिक शिंदे

सल्लागार सदस्य

श्री. नारायण य. वडाम,	श्री. राजगोंडा बा. चिंचणे,
श्री. शंकर हरी सुतार,	श्री. नंदकिशोर वि. देसाई,
श्री. संजय शि. बुड्डे,	श्री. संभाजी ग. कांबळे,
श्री. संभाजी रा. यादव	श्री. एम. डी. पाटील

मी स्वतः संस्थापक चेअरमन या नात्याने जबाबदारीने अविरत परिश्रम घेऊन श्रद्धेने व निष्ठेने काम करीत असताना

यश न मिळणे याचा अर्थ अपयशी होणे असा नाही.

संस्था प्रगतीपथावर आणण्यासाठी **सर्व संचालक मंडळ, सभासद व ठेवीदार** यांनी केलेले **सहकार्य व योगदान** तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या संस्थेचा कारभार हा स्वच्छ व पारदर्शक आणि अत्यंत काटकसरीने केलेला आहे हे स्पष्ट करताना मला व्यक्तिश: अभिमान वाटतो.

संस्थेच्या उल्लेखनीय बाबी

विशेष बाब :-

*** संस्थेने आपल्या कामकाजात सभासदांच्यासाठी घेतलेले धाडसी निर्णय**

१) लॅपटॉपसाठी बिनव्याजी कर्ज योजना,

२) सेवानिवृत्त सभासदांना रु. ३ लाख कर्ज देणारी योजना

३) शिक्षकांच्या पगार विलंबाच्या कालावधीत प्रत्येक सभासदाला बिनव्याजी व विनाकपात एकरकमी रु.१००००/– देणे.

४) सभासद प्रॉव्हिडंड फंड योजना – अभुतपूर्व प्रतिसाद मिळालेली व जिल्हा परिषदेच्या फंड योजनेला अनुसरुन राबविलेली ही योजना सभासदांसाठी पर्वणी ठरली. यामध्ये ३६ लाख ३७ हजार ३०३ रुपयांची गुंतवणूक झाली.

५) सभासद कल्याण ठेव – सेवेत असताना कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास जमा सभासद कल्याण ठेवीच्या १० पट रक्कम परतावा केली जाते. (एकूण जमा रक्कम रु. ५०,२४०००/–)

भेटी

अहवाल सालात जिल्हा परिषद कोल्हापूरच्या प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी सौ. मिना शेंडकर व सौ. सुवर्णा सावंत यांनी भेट देऊन संस्था कामकाजाबाबत समाधान व्यक्त करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

जीवनातील प्रत्येक क्षणी शिकणं म्हणजे शिक्षण.

शासकीय ऑडिट :- (वर्ग 'अ')

आपल्या संस्थेचे दि. ०१/०१/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेरचे शासकिय ऑडिट, प्रमाणित लेखापरिक्षक श्री. व्ही. बी. चव्हाण यांनी केले असून दप्तरी कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांनी केलेले मार्गदर्शन व मौलिक सुचना याबद्दल त्यांचे सहकारी यांचे मन:पूर्वक आभार!

संस्थेला सन २०२५-२०२६ सालात ऑडिट वर्ग 'अ' मिळालेला आहे.

आभार:-

संस्था स्थापनेसाठी ज्यांनी सर्वच पातळ्यांवर खंबीर साथ व पाठबळ दिले ते आमचे सर्वेसर्वा विद्यमान आमदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष व सलग २० वर्षे जिल्हा काँग्रसचे अध्यक्षपद भूषविलेले भोगावती सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन स्वर्गीय आमदार पी. एन. पाटीलसो (सडोलीकर), करवीरचे विद्यमान उपनिबंधक मा. प्रेमदास राठोड, सरपिराजीराव पतसंस्था कागल, शाहूवाडी तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्था, कोल्हापूर महानगरपालिका, खाजगी शिक्षक सेवक पतसंस्था, पी. सी. पाटील गुरुजी शिक्षक पतसंस्था गडहिंग्लज, करवीर तालुका पंचायत समिती कर्मचारी पतसंस्था, व करवीर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था या सर्व संस्थांचे चेअरमन व्हा. चेअरमन, संचालक, व्यवस्थापक व कर्मचारी वर्ग, या सर्वांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच शालार्थ वेतन प्रणालीद्वारे संस्थेकडे वसूल पाठविण्यास सहकार्य करणारे गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शालार्थ समन्वयक यांचेही मी या प्रसंगी विशेष आभार मानतो.

अभिनंदन :-

जे सभासद व सभासदांचे पाल्य यांनी अहवाल सालात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करुन आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवलेला आहे, त्या सर्वांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन!

समारोप :-

संस्थेच्या उज्वल भविष्यासाठी आपण संस्थापक चेअरमन श्री. एस्. व्ही. पाटील व संचालक मंडळावरील **आपला विश्वास आणखी दृढ करून परिपूर्ण सहकार्य करावे ही अपेक्षा व्यक्त करतो** व चालू सन २०२५–२०२६ या सालातील तेरीज, ताळेबंद, नफा–तोटा, नफा विभागणी व मागणी बजेट संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या वतीने आपणासमोर मंजुरीसाठी सादर करीत आहे. त्यास आपण सर्वानुमते मंजुरी द्यावी, ही विनंती.

व्यवस्थापक समितीच्या वतीने
आपला नम्र,
श्री. सात्ताप्पा विष्णू पाटील (एस्.व्ही.)
प्रेसिडेंट
छ. शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

आपले सौख्य हे आपल्या विचारावर अवलंबून असते.

छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

ताळेबंद पत्रक नं. २ दि. ३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५ रुपये पैसे	भांडवल व देणी	पोट रक्कम ३१/०३/२०२६ रुपये पैसे	३१/०३/२०२६ रुपये पैसे
	अधिकृत भाग भांडवल		२५,००,०००.००
६,००,७३०.००	वसुल भाग भांडवल		५,९७,५३०.००
६,००,७३०.००	मेंबर शेअर्स	५,९७,५३०.००	
५२,२८,६२३.१३	निधी		६१,६४,६६६.९३
१३,७५,३३१.२०	राखीव निधी	१६,२५,५२९.२०	
२९,२९,४१८.६५	इमारत निधी	३४,०१,४१८.६५	
४५,०००.००	धर्मादाय निधी	५०,०००.००	
२,४६,५३३.००	बुडीत निधी	२,७१,५३३.००	
६,३२,३४०.२८	सभासद कल्याण निधी	८,१६,१८६.०८	
८,९०,५४,३४८.७७	ठेवी		१०,१२,४४,६७५.७७
४३,४५,५००.००	सभासद कल्याण ठेव	५०,२४,०००.००	
६४,९६,९८५.००	मासिक वर्गणी	६९,४३,३१९.००	
६,३४,५९,०४१.००	मुदत ठेव	७,४०,५९,६६९.००	
२३,२०,५३५.००	रिकरींग ठेव	२२,३४,६३५.००	
६८,०९,२४०.००	कायम ठेव	८०,५९,९९०.००	
१४,७१,२४५.७७	सेव्हिंग ठेव	९,५७,७९५.७७	
२,५०,०५५.००	दामदुप्पट ठेव	२,९५,०६४.००	
३०,८८,१६३.००	भविष्यनिर्वाह ठेव	३६,३७,३०३.००	
८,१३,५८४.००	सेव्हिंग ठेव ब वर्ग	३२,९००.००	
३०,७९,९८४.००	इतर देणी		३६,३०,७०५.००
२,१४,०१८.००	देणे रिकरिंग व्याज	२,२०,३५३.००	
४,९८,६१२.००	देणे वर्गणी व्याज	५,१९,७६०.००	
४,८६,२७२.००	देणे कायम ठेव व्याज	५,४४,७४०.००	
१७,५६,००३.००	देणे मुदत ठेव व्याज	२२,१०,१६७.००	
५,०००.००	देणे टॅक्स कन्स. फी	५,०००.००	
२८,८००.००	देणे संचालक मि. भत्ता	२८,८००.००	
१,०००.००	नाममात्र सभासद	१,०००.००	
६५,२७९.००	देणे ऑडीट फी	७५,८८५.००	
१०,०००.००	देणे सॉफ्ट. दे. खर्च	१०,०००.००	
१५,०००.००	देणे हार्ड. दे. खर्च	१५,०००.००	
६,९८,२२४.००	तरतूदी		६,९८,२२४.००
४,६५,४८३.००	एन.पी.ए.तरतूद	४,६५,४८३.००	
२,३२,७४१.००	उत्तम जिंदगी तरतुद	२,३२,७४१.००	
५३,३२,०८९.५०	बाहेरील कर्जे		३०,२६,३८०.५०
	केडीसीसी बँक ओडी/चालू	३०,२६,३८०.५०	
१०,००,७९२.५०	नफा		१०,३६,८७२.२०
१०,४९,९४,७९२.२०	एकूण बेरीज		११,६३,९९,०५४.४०

येणेप्रमाणे असे दि. ३१/०३/२०२६

श्री. जयवंत ईश्वरा तौंदकर — मॅनेजर

श्री. सातप्पा विष्णू पाटील (एस.व्ही.) — चेअरमन

श्री. बाबूराव रामचंद्र खोत (व्हा. चेअरमन)

प्रार्थना म्हणजे ईश्वराच्या जवळ जाण्याची शक्ती होय.

छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर.

ताळेबंद पत्रक नं. २ दि.३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५ रुपये पैसे	मालमत्ता व येणी	पोट रक्कम रुपये पैसे	३१/०३/२०२६ रुपये पैसे
११,०२२.००	**बाहेरील कर्जे**		३३,०१५.००
११,०२२.००	रोख शिल्लक	३३,०१५.००	
२,२३१.२०	**रोख व बँक शिल्लक**		३,१४,७४५.४०
	शिक्षक बँक चालू खाते	२,८९,७४५.४०	
	बँक ऑफ महा. चालू खाते	२५,०००.००	
	गुंतवणूक		१,४१,८१,४४२.००
६,७५,०००.००	शिक्षक बँक मु.ठेव		
७०,००,०००.००	केडीसीसी बँक मु.ठेव	७९,५०,०००.००	
२७,३१,४४२.००	क.ता.पं.स.कर्म.सह. पतठेव	२७,३१,४४२.००	
	द.रा.पाटील ना.पतसंस्था मुदतसडोली	३५,००,०००.००	
	मेंबर कर्ज		१०,१३,०९,२६०.००
८,४०,९८,११०.००	रेग्युलर कर्ज	९,३०,३६,८३४.००	
७९,३४,८४२.००	आकस्मित कर्ज	६९,१४,३५६.००	
१०,६३,५७२.००	मध्यममुदत कर्ज	११,६८,२५९.००	
९,८८,३५०.००	ठेवतारण कर्ज	१,८९,८११.००	
	मालमत्ता		२७,९५२.००
३३,१९३.००	डेडस्टॉक	२७,९५२.००	
	इतर येणी		५,३२,६४०.००
-	निवडणुक डिपॉझीट	-	
२०,०००.००	ऑफिस डिपॉझीट	२०,०००.००	
४,३७.०३०.००	येणे गुंतवणुकीवरील व्याज	५,१२,६४०.००	
१०,४९,९४,७९२.२०	**एकूण**		११,६३,९९,०५४.४०

येणेप्रमाणे असे दि. ३१/०३/२०२६

श्री. जयवंत ईश्वरा तौंदकर
मॅनेजर

श्री. साताप्पा विष्णू पाटील (एस.व्ही.)
चेअरमन

सौ. पद्मावती काळुगडे
(व्हा. चेअरमन)

जो गुरु असेल तो शिष्य असेलच असे नाही.

नफातोटा पत्रक नं. दि. ०१/४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेर

उत्पन्न तपशील	रक्कम रुपये पैसे	खर्च तपशील	रक्कम रुपये पैसे
सरळ व्याज	९६,२०,२९७.००	मुदत ठेव व्याज	६६,५२,१७७.००
प्रवेश फी	१,३००.००	रिकरींग ठेव व्याज	१,६२,४०६.००
फॉर्म फी	६,०००.००	मासिक वर्गणी व्याज	५,१९,७६०.००
गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज	६,६६,४८३.००	कायम ठेव व्याज	५,४४,७४०.००
		बँक कमिशन/चार्जेस	१,०१४.८०
		इमारत भाडे	७२,०००.००
		घसारा	५,२४१.००
		नोकर पगार	२,१६,०००.००
		प्रिंटींग स्टेशनरी	१७,९९५.००
		प्रवास खर्च	१९,३५०.००
		झेरॉक्स व टायपिंग	६,१५२.००
		जनरल सभा खर्च	१,३१,४३०.००
		सत्कार समारंभ खर्च	२२,२५२.००
		जाहिरात	२,५००.००
		भविष्यनिधी ठेव व्याज	२,५९,४०२.००
		लाईट बील	८,०६०.००
		सभासद दिपावली भेटवस्तू	२,१०,७२५.००
		मानधन	१२,०००.००
		ऑडीट फी	७५,०००.००
		सेव्हिंग ठेव व्याज	३७,०५५.००
		दामदुप्पट ठेव व्याज	४५,००९.००
		ऑफीस खर्च	२६,२१५.००
		पोस्टेज	१००.००
		अहवाल छपाई खर्च	२२,१५०.००
		टॅक्स कन्सल्टींग फी	५,०००.००
		सॉफ्टवेअर देखभाल खर्च	१०,०००.००
		वसुली खर्च खाते	१४,५५०.००
		हार्डवेअर देखभाल खर्च	१५,८००.००
		केडीसीसी ओडी व्याज खर्च	१,४३,१२४.००
		नफा	१०,३६,८७२.२०
एकूण	१,०२,९४,०८०.००		१,०२,९४,०८०.००

येणेप्रमाणे असे दि. ३१/०३/२०२६

श्री. जयवंत ईश्वरा तौंदकर
मॅनेजर

श्री. साताप्पा विष्णू पाटील (एस.व्ही.)
चेअरमन

सौ. पद्मावती काळुगडे
(व्हा. चेअरमन)

हृदयावर अपार प्रेम असले की सर्वत्र मित्र लाभतात.

सन २०२५-२६ सालाकरीता उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक

अंदाजे उत्पन्न	रक्कम	अंदाजे खर्च	रक्कम
कर्जावरील व्याज	९९,८०,०००	ठेवीवरील व्याज	८५,८०,०००
गुंतवणुकीवरील व्याज	५,४०,०००	बँक चार्जेस	२,०००
इतर उत्पन्न	२०,०००	इमारत भाडे	८४,०००
		घसारा	१०,०००
		नोकर पगार	४२,०००
		प्रिंटींग स्टेशनरी	३०,०००
		प्रवास खर्च	२५,०००
		जनरल सभा खर्च	१,४०,०००
		सत्कार समारंभ खर्च	४३,०००
		जाहिरात	२५,०००
		दीपावली भेट वस्तू	३,००,०००
		मानधन	२०,०००
		ऑडिट फी	८०,०००
		ऑफिस खर्च	४०,०००
		देणगी	२०,०००
		टॅक्स कन्सल्टींग फी	५,०००
		सॉफ्टवेअर देखभाल खर्च	१५,०००
		हार्डवेअर देखभाल खर्च	१५,०००
		संचालक मिटींग भत्ता	३२,०००
		अंदाजे नफा	१०,४७,०००
एकूण	१,०५,४०,०००	एकूण	१,०५,४०,०००

येणेप्रमाणे असे दि. ३१/०३/२०२६

श्री. जयवंत ईश्वरा तौंदकर
मॅनेजर

श्री. साताप्पा विष्णू पाटील (एस.व्ही.)
चेअरमन

सौ. पद्मावती काळुगडे
(व्हा. चेअरमन)

जीवन जगण्याची कला हीच सर्व कलांमध्ये श्रेष्ठ आहे.

संस्था प्रगतीचा अहवाल (आकडे लाखात)

अंदाजे उत्पन्न	२०२१–२०२२	२०२२–२०२३	२०२३–२०२४	२०२४–२०२५	२०२५–२०२६
सभासद	३१०	३३२	३४५	३५२	३३०
शेअर भांडवल	५.१७	५.४५	४.७८	६.०७	५.९७
निधी	२६.३२	३४.४२	४३.०२	५२.२८	६१.६४
ठेव	७७५.००	७८६.९०	८८३.१६	८९०.५४	१०१२.४४
गुंतवणूक	३३.००	५२.३१	६९.८१	१०४.०६	१४१.८९
कर्जे	७४२.००	८०८.८७	९०१.५०	९४०.८४	१०१३.०९
खेळते भांडवल	७६६.७४	८७०.३२	९७६.९४	१०४९.९४	११६३.९९
नफा लाभांश	८.४०	९.१३	९.८६	१०.०७	१०.३६
(डिव्हिडंड)	१४%	१५%	१५%	१५%	१५%
ऑडिट वर्ग	'अ'	'अ'	'अ'	'अ'	'अ'

कामकाजाची वेळ
सोमवार ते शुक्रवार - दुपारी १२ ते ७
साप्ताहिक सुट्टी - गुरुवार

संपर्क नंबर

श्री. एस्. व्ही. पाटील : ९४२०४५९२९२
सौ. पद्माताई प्र. काळुगडे : ९८८१०८०६४०
श्री. जयवंत तौंदकर : ९८६०८०८९१९
श्री. हरी शिपेकर : ७०८३४३०४०८

वाचन, मनन आणि लेखन म्हणजे अध्ययन

लेखापरिक्षकाचा अहवाल

छ. शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., कोल्हापूर या संस्थेचे दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३१/०३/२०२६ या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरीक्षण केलेले असून त्यामध्ये ३१/०३/२०२६ या दिनांकाचा ताळेबंद त्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीमधील नफातोटा पत्रक/ उत्पन्न खर्च पत्रक आणि त्यामध्ये समाविष्ट केलेल्या हिशोबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

मी असा अहवाल करतो की,

अ) लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे आणि विश्वासानुसार आम्हांस जरुर ती सर्व माहिती आणि खुलासे उपलब्ध झालेले आहेत आणि ते समाधानकारक आहेत

ब) आमच्या तपासणीतून जीतपत दृष्टोत्पतीस येईल त्याप्रमाणे संस्थेने केलेले व आम्ही तपासलेले सर्व व्यवहार संस्था अधिकाराच्या मर्यादितच केलेले आहेत.

क) लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठीची संस्थेच्या शाखा आणि कार्यालयाकडून प्राप्त झालेली विवरण पत्रके परिपूर्ण आहेत.

आमच्या मते ताळेबंद व नफा तोटा पत्रक/उत्पन्न खर्च पत्रक यांचे अनुपालन लेखांकन माणकाप्रमाणे आहे.

मी असा अहवाल करतो की,

१) अहवालासोबत जोडलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक/उत्पन्न खर्च पत्रके ही संस्थेच्या हिशोब पुस्तके व विवरण पत्रकांशी सुसंगत आहेत.

२) आमच्या मते व आमच्या दप्तर तपासणीत जितपत दृष्टोत्पतीस येईल त्याप्रमाणे संस्थेने कायद्यानुसार आवश्यक व योग्य ती सर्व हिशोब पुस्तके ठेवली आहेत.

३) शाखांच्या जमाखर्चाचे लेखापरिक्षकांनी तपासलेले अहवाल आमच्या आवश्यकतेप्रमाणे व अहवाल तयार करणेच्या गरजेनुसार विचारात घेतले असून सुसंगत आहेत.

४) संस्थेस चालू तपासणी कालावधीसाठी ऑडिट वर्ग 'अ' देणेत आला आहे.

लेखापरिक्षक नामतालिका नंबर : १६३८२

ठिकाण : कोल्हापूर

श्री. व्ही. बी. चव्हाण
प्रमाणित लेखापरिक्षक

दिनांक : ३०/०६/२०२६

मोठी स्वप्ने पाहणारेच, मोठी स्वप्ने सत्यात उतरवतात

कर्ज प्रकरणास लागणारी कागदपत्रे

१) केंद्र मुख्याध्यापक / केंद्र प्रमुख यांचे सहीचा पगार दाखला.
२) दोन जामिनदार (थकबाकी नसणारे)
३) सात पावती तिकिटे.
४) रुपये ५००/- चा स्टॅम्प जोडणे आवश्यक.
५) कर्जदार यांचे दोन कोरे चेक.
६) इतर संस्थांचा ना हरकत दाखला.
७) कर्जदार व जामिनदार यांचे आधार कार्ड / पॅनकार्ड / मतदान ओळखपत्र व प्रत्येकी २ फोटो आवश्यक

नवीन सभासद होणेसाठी लागणारी कागदपत्रे

१) सभासद होणेसाठी अर्ज.
२) नोकरीचा मुळ नेमणुक आदेश.
३) केंद्र प्रमुख / केंद्र मुख्याध्यापक यांचा दाखला.
४) रेशनकार्ड सत्य प्रत.
५) पासपोर्ट साईज २ फोटो.
६) आधार कार्ड / पॅनकार्ड / मतदान ओळखपत्र (कोणतेही एक) सत्य प्रत आवश्यक.
७) शेअर अनामत रक्कम भरावी लागेल.

येणेप्रमाणे असे दि. ३१/०३/२०२६

श्री. जयवंत ईश्वरा तौंदकर
मॅनेजर

श्री. साताप्पा विष्णू पाटील (एस.व्ही.)
चेअरमन

सौ. पद्मावती प्रकाश काळुगडे (व्हा. चेअरमन)

आपल्याला मदत करणाऱ्या माणसांशी नेहमी कृतज्ञ रहा

१२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची क्षणचित्रे

स्व. आमदार श्री. पी. एन. पाटील साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करताना
गोकुळ संचालक चेतन नरके, जि. प. चे कॅपो अतुल आकुर्डे व अन्य मान्यवर

वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या कार्याचा लेखाजोखा मांडताना संस्थेचे व
शिक्षक बँकेचे चेअरमन श्री. एस. व्ही. पाटील सर

वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना संबोधित करताना
गोकुळ संचालक श्री. चेतन नरके साहेब

वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना संबोधित करताना
जि. प. चे वित्त व लेखाधिकारी अतुल आकुर्डे

वार्षिक सर्वसाधारण सभेत मनोगत व्यक्त करताना संचालक बाबुराव खोत,
बाळासाहेब माने व पार्लमेंटरी बोर्ड सदस्य एकनाथ पाटील

मान्यवरांच्या उपस्थितीत संस्थेचे संचालक मंडळ, पार्लमेंटरी बोर्ड सदस्य
व सल्लागार मंडळ

दिवाळी भेटवस्तू वाटप समारंभ क्षणचित्रे

जि. प. सीईओ कार्तिकेयन एस. यांचेकडे पतसंस्थेचा प्रगतीदर्शक लेखाजोखा मांडताना चेअरमन एस. व्ही. पाटील

जि. प. सीईओ कार्तिकेयन एस. यांच्या शुभहस्ते दिवाळी भेटवस्तू वाटप सोबत उपस्थित मान्यवर

पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन श्री. एस. व्ही. पाटील सर यांचा सेवानिवृत्ती व गाडी प्रदान सोहळा

• प्रमुख उपस्थिती •

मा. श्री. राहुल पाटील साहेब व मा. श्री. संभाजीराव थोरात साहेब

पतसंस्था वार्तापत्र

शिक्षक बँकेच्या चेअरमन निवडीनंतर छत्रपती शिवाजी शिक्षक पतसंस्थेत झालेली पहिलीच सदिच्छा भेट, प्रसंगी उपस्थित मान्यवर

लोकमत

छत्रपती शिवाजी शिक्षक पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत डॉ. चेतन नरके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थापक एस. व्ही. पाटील, अतुल आकुर्डे, आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी शिक्षक संस्था आदर्शवत

चेतन नरके : पतसंस्था ४५ लाख कर्ज देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दूरदृष्टी ठेवून एस. व्ही. पाटील यांनी उत्कृष्ट काम करत खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने पतसंस्था चालवून सहकारात आदर्श निर्माण केल्याचे गौरवोद्गार थायलंड सरकारचे वाणिज्य सल्लागार डॉ. चेतन नरके यांनी काढले.

छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एस. व्ही. पाटील-सडोलीकर अध्यक्षस्थानी होते. सेवानिवृत्त सभासद व आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा यावेळी गौरव करण्यात आला.

जिल्हा परिषदेचे वित्त व लेखा अधिकारी अतुल आकुर्डे, संस्थापक एस. व्ही. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सभासदांच्या मागणीनुसार, ४५ लाख कर्जमर्यादा करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. बाबूराव खोत यांनी स्वागत, सविता कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी उपाध्यक्ष पद्मावती काळुगडे, संचालक राजाराम घुंगूरकर, संभाजी एकशिंगे, गोपाळ कदम, प्रकाश गायकवाड उपस्थित होते. बाळासाहेब माने यांनी आभार मानले. (वा.प्र.)

शिक्षक संघाच्या संपर्क कार्यालय भेटीवेळी शिक्षक नेते संभाजीराव थोरात, संघाचे अध्यक्ष बाळासाहेब मारणे व राजुमामा जगताप

सामाजिक व विविध उपक्रमातील सहभाग

श्री. एस. व्ही. पाटील सर यांची प्रा. शिक्षक बँकेच्या चेअरमनपदी निवड झालेनंतर सभासदांना अभिवादन करताना...

छ. शिवाजी पतसंस्थेला जि. प. च्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी सौ. मीना शेंडकर व सौ. सुवर्णा सावंत यांच्या सदिच्छा भेटीदरम्यान उपस्थित शिवाजी परिवार.

श्री सातापा विष्णू पाटील (एस. व्ही.)
चेअरमन

छत्रपती शिवाजी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. कोल्हापूर.

मो. ९४२०४५९२९२, ९४०४९८२७२१